N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे ग्रामीण  **P.S.(ठाणे):** मुरबाड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0143  **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/06/2024 05:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 11/06/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/06/2024

**Time From (वेळेपासून):** 10:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/06/2024  **Time (वेळ):** 04:19 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/06/2024 04:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती मुरबाड आवारात, मुरबाड,मुरबाड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल अनंता आलम

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अनंता आलम

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचें ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोस्ट माझगांव,नांदगाव, ,मुरबाड,मुरबाड ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोस्ट माझगांव,नांदगाव, ,मुरबाड,मुरबाड ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7977013291

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | यासीन इस्माईल शेख | | | 1. न्यु वस्ती ,बोरीवली पडघा, भिवंडी,मुरबाड ,ठाणे ग्रामीण , महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

दिनांकः-12/06/2024 मुरबाड, जि. ठाणे

मी, सुनिल अनंता आलम, वय 43 वर्षे, धंदा- उप सरपंच, राहणार- नांदगाव, पोस्ट माझगांव, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे. मो.नं. 7977013291 असा आहे.

मी वर नमुद पत्त्यावर कायमस्वरूपी माझे परिवारासह राहणेस आहे. मी नांदगाव खुटल बंगला ग्रामपंचायतीचा उप सरपंच आहे.

ठेकेदार श्री. राहुल सुरेश हिंदुराव हे तक्रारदार यांचे चांगले मित्र आहेत व त्यांचे ब-याच ठिकाणी विविध प्रकारची सिव्हील कंस्ट्रक्शनची कामे चालु असतात, त्यामुळे कामाच्या व्यापामुळे त्यांना सगळया कामांकडे लक्ष देणे जमत नाही. सदर ठेकेदार श्री. हिंदुराव यांना सन 2023-2024 मध्ये मौजे नांदगाव येथे नवीन इमारत बांधकामाचे काम मिळाले होते. नवीन इमारत बांधकामाचे देखभाली तक्रारदार यांचेवर जबाबदारी दिली तसेच बिल मजुंर करणे, प्रत्यक्ष साईटवर कामाची पाहणी करणे तसेच कागदोपत्री कामाची पुर्तता करण्याचे काम तक्रारदार यांना दिलेले आहे.

मौजे नादंगाव येथील नवीन इमारत बांधकाम टेंडर मंजूर झालेले असून, त्या कामाचे बिल सुमारे 20 लाख रू. मंजूर करण्यात आलेले होते. त्यातील अर्ध्या बांधकामाची रक्कम रू. 10 लाख तक्रारदार यांना अदा करण्यात आलेली होती. उर्वरीत रू. 9,24,595/- रक्कमेचे बिल मंजूर करण्याकरीता लोकसेवक श्री. वाय.आय.शेख यांनी तक्रारदार यांचेकडे 2 टक्के प्रमाणे (अर्थात 20,000/-रु.ची) मागणी करीत आहेत.

तरी मला ग्रामपंचायत नांदगावचे ग्रामसेवक श्री. वाय.आय.शेख यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. म्हणून त्यांचेविरूध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. माझे व वरील लोकसेवक यांचेशी कोणत्याही प्रकारचे वैर नसुन मी त्यांची काही देणे लागत नाही. करीता दिनांक 10/06/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे हजर राहून तक्रार दिली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 11/06/2024 रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन, डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून, पंच साक्षीदार यांचे समक्ष ग्रामसेवक नांदगाव श्री.यासीन ईस्माइल शेख यांचे विरूध्द सरळगाव येथील बॅक ऑफ बडोदाच्या समोर येथे पडताळणी कारावाई केली असता, लोकसेवक श्री. शेख म्हणाले की, तुम्ही ते हयाच बघा.. ते आपल्या किती दोन टक्केच जे ऑडिट आहे ना मला विचारतात त्याचा एक रूपया पण नाही आला मला, तुम्ही विचाराना कुणाला आता, आता हयाच एक रूपया पण नाही आला आपल्याला, त्यावर मी त्याना म्हणालो आहो भाऊसाहेब दोन टक्के लय होतात ना, अहो दोन टक्के, तीन टक्के असे सांगितल्यानंतर लोकसेवक श्री. शेख म्हणाले की, आता ऐकाना हयाच्या एक रूपया पण नाही आला आपल्याला, तुम्ही कितीही काही सांगा, आपला एक दहा लाखाचा झाला विधी घाटबरोबर, पण ऐकाना त्या दहा लाखचा किती घ्याल, हे पाच लाखाच आता पण केलं नाही अजून पहिले तुम्ही पाच दिले., आज तुम्हाला हे बघा अठरा नाय देणार तुम्हाला आज, दोन टक्के असतात. असे म्हटल्यावर त्यावर मी त्याना ऐकाना किती देउ किती भेटणार आजच सांगा, कॅल्सी घेवून सांगा, किती पण किती सांगल तर खरी असे सांगितले. त्यावर लोकसेवक श्री. शेख म्हणाले ज्या रक्कमेचे दहा हजार म्हणजे किती झाले दहा लाखाचे वीस हजार असे म्हणल्यावर त्यावर मी त्याना म्हणालो वीस हजार कुठ बाबा, वीस हजार मरल ना माणूस इथ तुम्हाला मी आज एक दहा हजार रूपये मी देईन असे बोलल्यानंतर सदर ठिकाणाहुन मी व पंच नं. 1 श्री. वामन बांगारा असे दोघे पायी चालत शासकीय वाहन ज्या ठिकाणी उभे होते त्या ठिकाणी येवून शासकीय वाहनामध्ये बसलो. त्यानंतर पोहवा/ पोटे यांनी माझ्या शर्टाच्या आत बनियनला लावण्यात आलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला.

सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण शासकीय वाहनामध्ये पो.नि. कावळे तसेच पंचांनी ऐकले असता, लोकसेवक श्री. शेख; ग्रामसेवक यांनी बांधकामाचे बिल करण्याकरीता दोन टक्के प्रमाणे म्हणजे



Scanned with OKEN Scanner

20,000/-रु. लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले. तसेच सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत झालेले आहे.

वरील प्रमाणे लोकसेवक श्री.यासीन ईस्माइल शेख, ग्रामसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांना अल्पवधीतच द्यावयाची असल्याने पोनि विजय कावळे यांनी सुरु असलेल्या कारवाईमध्ये पडताळणी पंचनामा, सापळापूर्व पंचनामा व सापळा पंचनामा स्वतंत्रपणे करणे करीता पुरेसा अवधी नसल्याने, सदर कारवाईमध्ये पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा एकत्रित करण्याचा निर्णय घेतला. तसेच लाचेची रक्कम देण्यास विलंब झाल्यास लोकसेवक श्री.यासीन ईस्माइल शेख, ग्रामसेवक यांस संशय येवू नये म्हणून लागलीच, मोहोप रस्ता नारायणगाव जवळ शासकीय वाहनातच सापळापुर्व पंचनामा कारवाई करण्याचा निर्णय पोनि विजय कावळे यांनी घेतला. व त्याचवेळी पोनि विजय कावळे यांनी मला लोकसेवक ग्रामसेवक नांदगाव श्री.यासीन ईस्माइल शेख यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेची रक्कम 20,000/-रु. आहेत काय? याबाबत विचारले असता, मी पोनि श्री. कावळे यांना सांगितले की, माझेकडे फक्त आता 10,000/-रु असून, लोकसेवक श्री. शेख हे 10,000 /-रु. घेतील असे सांगितले. मी माझेकडील स्वबचतीतील 10,000/-रु. लाचेच्या सापळा केसकामी हजर केले. नोटांचे नंबर नोंदवून त्यास अँन्थ्रासीन पावडर लावून, त्याचे प्रात्यक्षिक अल्ट्राव्हाइलेट दिव्याच्या प्रकाशात दाखवून सापळापुर्व कारवाई करण्यात आली व सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्यानंतर माझेकडून ग्रामसेवक नांदगाव श्री.यासीन ईस्माइल शेख यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर, मला माझे गाडीची चावी खाली टाकून, ती खाली वाकून उचलण्याचा पूर्वनियोजीत ईशारा करणेबाबतच्या सुचना पोनि विजय कावळे यांनी दिल्या.

त्यानंतर सरळगाव येथील बॅक ऑफ बडोदाच्या समोर सापळा आजमाविण्याचा निर्णय पोनि विजय कावळे यांनी घेतला. त्याप्रमाणे पोनि विजय कावळे हे स्वत:, पोहवा लोटेकर, पंच नं.2 श्री. करण विषे असे पायी चालत सरळगाव येथील बॅक ऑफ बडोदाच्या दिषेने गेल्यानंतर काही वेळेने पोहवा/पोटे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून, माझे षर्टच्या आतील बनियनमध्ये ठेवून दिल्यानंतर, मी व पंच नंबर 1 श्री. बांगारा असे आम्ही पायी चालत व आमचे पाठोपाठ पोहवा पोटे हे देखील पायी सरळगाव येथील बॅक ऑफ बडोदाच्या दिषेने असे सर्व सापळा पथक सरळगाव येथील बॅक ऑफ बडोदाच्या ठिकाणी पोहचलो. त्यानंतर मी व पंच नं.1 श्री. बांगारा असे आम्ही लोकसेवक श्री. यासीन शेख यांची भेट घेण्यासाठी सरळगाव येथील बॅक ऑफ बडोदाच्या येथे पोहचलो. त्यावेळी उर्वरीत सापळा पथक सरळगावाच्या मुख्य रस्त्यावर बाजारात कोणास संषय येणार नाही अषा रितीने सापळा रचून थांबुन राहिले होते.त्यानंतर मी व पंच नंबर 1 श्री. बांगरा असे सरळगाव बॅक ऑफ बडोदाच्या समोर ग्रामसेवक श्री. यासीन शेख हे उपस्थित होते. त्यावेळी मी लोकसेवक श्री शेख यांना म्हणालो दहा हजार, सर प्लीज, दहा हजार आहेत त्यावर लोकसेवक श्री. शेख मला म्हणाले राहू दया ना, नंतर द्या, आता नका देवून, चेक क्लीयर व्हायला तीन चार दिवस लागतील असे बोलल्यावर त्यावर मी त्याना म्हणालो.ऐकाना, देतोना प्लीज एवढे पैसे नाहीत माझ्याकडे त्यावर लोकसेवक श्री. शेख म्हणाले नकाना, नंतर दया तुम्ही पण पुरेच दया, त्यावर मी त्याना म्हणालो ऐका आणखी पाच वाटलंत ऐकाना प्लीज अहो मी तर देवू शकत नाही भाउसाहेब कशाला माझ एवढं डोक खाता मला नाहीना त्यावर लोकसेवक श्री. शेख म्हणाले तुम्ही या ना मुरबाडला, मुरबाडला आहे मी असे सांगितल्यावर लोकसेवक श्री. शेख हे तेथून निघून मुरबाड ऑफिसला गेले. त्यानंतर पोनि कावळे यांनी मला ईशारा करून, मोहोप नारायणगाव येथे येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 श्री. वामन बांगारा असे दोघे पायी चालत शासकीय वाहन ज्या ठिकाणी उभे होते त्या ठिकाणी येवून शासकीय वाहनामध्ये बसलो. त्यानंतर पोहवा/ पोटे यांनी माझ्या शर्टाच्या आत बनियनला लावण्यात आलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला.

सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण शासकीय वाहनामध्ये पो.नि. कावळे तसेच पंचांनी ऐकले असता, लोकसेवक श्री. शेख, ग्रामसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारली नसून, तक्रारदार यांना 20,000/-रु. घेवून मुरबाड येथील ऑफिसला घेवून येण्यास सांगितले.

त्यानंतर काही वेळाने मला त्याचा फोन आला आणि सांगितले की, मी मिटीग मध्ये पंचायत समिती, मुरबाड याठिकाणी आहे. तरी तुम्ही तेथे या असे सांगितल्यानंतर त्यानंतर सदरची माहिती पोनि कावळे यांना दिली. व त्यानी पुन्हा सापळा कारवाई सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पोनि विजय कावळे यांनी मला लोकसेवक ग्रामसेवक नांदगाव श्री.यासीन ईस्माइल शेख यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्यासाठी लाचेची रक्कम देण्यासाठी 5,000/-रु. आहेत काय? याबाबत विचारले असता, मी पोनि श्री. कावळे यांना सांगितले की, माझेकडे आता 5,000/-रु. आहे. त्यानंतर पोनि श्री. कावळे यांनी पंचाना व मला सांगितले की, उर्वरित 2,500/- रूपये करीता खेळण्यातील नकली नोटा (टॉय नोट) चा वापर करण्यात येणार आहे. त्यानंतर पोनि श्री. कावळे यांनी त्यांचे कार्यालयीन बॅगेतून खेळण्यातील नकली नोटा (टॉय नोट) बाहेर

Scanned with OKEN Scanner

काढल्या. सदरच्या नोटा दोन्ही पंचास तसेच तक्रारदार यांना दाखविल्या त्यामध्ये 500/- रूपये दराच्या एकुण 5 नोटा असे एकुण 2,500/- रूपये (टॉय नोट) असल्याचे दिसून आले. पो.नि.कावळे यंानी पथकातील एका कर्मचाÚयाकडून त्या नोटांच्या क्रमांक नोंदविण्यात आले आहे. पो.नि. कावळे यांच्या सुचनेनुसार पोलीस वाहनाचे चालक पोहवा श्री. आहिरे यांनी मला व पंचाना अँन्थारॅसीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व त्यानंतर चालक पोहवा श्री. आहिरे यांनी मी दिलेल्या रु. 500/- रूपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा, असे एकुण 15,000/- तसेच खेळण्यातील नकली नोटा (टॉय नोट) असे एकुण 2,500/- रूपये (टॉय नोट) नोटांना पो.नि.श्री. कावळे यांचे शासकीय वाहनात उर्वरीत नोटाना अँन्थ्रॉसीन पावडर लावली आणि माझ्या शर्टाच्या पुढील डावे खिशात अलगद ठेवल्या.

त्याप्रमाणे पोनि विजय कावळे हे स्वतः, पोहवा लोटेकर, पंच नं.2 श्री. करण विषे असे सरकारी वाहनाने दिशेने गेल्यानंतर काही वेळेने पोहवा/पोटे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून, माझे शर्टच्या आतील बनियनमध्ये ठेवून दिल्यानंतर, मी व पंच नंबर 1 श्री. बांगारा असे आम्ही पायी चालत व आमचे पाठोपाठ पोहवा पोटे हे देखील पायी पंचायत समिती, मुरबाड यादिशेने असे सर्व सापळा पथक पंचायत समिती, मुरबाड याठिकाणी पोहचलो. त्यानंतर मी व पंच नं.1 श्री. बांगारा असे आम्ही लोकसेवक श्री. यासीन शेख यांची भेट घेण्यासाठी पंचायत समिती, मुरबाड येथे पोहचलो. त्यावेळी उर्वरीत सापळा पथक पंचायत समितीच्या आवारात कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा रचून थांबुन राहिले होते. त्यानंतर ग्रामसेवक श्री. शेख यांची मिटीग संपल्यानंतर, मुख्य दरवाजाच्या बाहेर येवून, पंचायत समितीच्या आवारात आल्यावर लोकसेवक श्री. शेख मला म्हणाले की, आल्यावर दया ना पैसे, ते येतील ना पैसे, येथे लागतात ना नाहीतर मी भरेन दहा हजार आत काय नशीब आपल असे बोलल्यावर मी त्याना म्हणालो वीस आहेत, आता तरी टेंशन घेवू नका आणि माझ पुढच काम करून दया असे म्हटल्यावर त्यांनी पैशाची मागणी करून, डाव्या हाताने ईशारा केला असता, मी माझे शर्टचे पुढील डाव्या खिशात ठेवलेली 17,500/- रुपये लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने खिशातून बाहेर काढून ती ग्रामसेवक श्री. शेख यांचेसमोर धरली असता ती त्यांनी त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन, ती लाचेची रक्कम पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवून दिल्यानंतर, मी गाडीची चावी खाली टाकून, खाली वाकून सापळा पथकास दिसेल अषा रितीने, लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबतचा पूर्वनियोजित इशारा केला. त्यानंतरचा पोहवा आहिरे यांनी लोकसेवक श्री. शेख यांना पकडल्यानंतर लाचे .
त्यानंतरचा पोहवा आहिरे यांनी लोकसेवक श्री. शेख यांना पकडल्यानंतर लाचेची रक्कम त्यानी फेकून दिली.

मी केलेला इशारा पाहुन सापळा पथकातील पोनि विजय कावळे, पोहवा/पोटे, पोना लोटेकर, व पंच नंबर 2 श्री. विशे असे माझे जवळ आल्यानंतर, पोनि विजय कावळे यांनी खाली फेकून दिलेली लाचेची रक्कम पंच नंबर 2 श्री. विशे यांना उचलून ताब्यात घेण्यास सांगितले. त्यानंतर पोनि विजय कावळे यांनी पंच नंबर 2 श्री. विषे यांचेकडील, हस्तगत नोटांचे नंबर्सची सापळापुर्व कारवाईत नमुद केलेल्या नंबर्सशी पडताळले असता ते तंतोतंत जुळुन आलेले आहेत.

त्यानंतर चापोहवा आहिरे व पोहवा लोटेकर यांनी लोकसेवक ग्रामसेवक श्री. षेख यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट धरुन ठेवले व पुढील कारवाईकामी ताब्यात घेतले. ती वेळ 15:20 वाजताची होती. त्यावेळी पोनि विजय कावळे यांनी ग्रामसेवक श्री. शेख यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता विचारले असता, ग्रामसेवक यांनी त्यांचे नाव श्री. यासीन ईस्माइल शेख, वय 52 वर्शे, धंदा-नोकरी, पद- ग्रामसेवक नांदगाव, पंचायत समिती, मुरबाड, राह. रूम नंबर 504, न्यू वस्ती बोरीवली, पो.पडघा, ता. भिंवडी, जि. ठाणे असे असल्याचे सांगितले.

तरी, मी दिनांक 10/06/2024 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक 11/06/2024 रोजी 10:15 वा. ते 15:20 वा. पावेतो सरळगाव बॅक ऑफ बडोदाच्या समोर व पंचायत समिती, मुरबाड, ता. मुरबाड, जि. ठाणे या ठिकाणी करण्यात आलेल्या पडताळणी-सापळापुर्व-सापळा पंचनामा कारवाईत, नवीन बांधकामाचे बिल मंजूर करण्याकरीता ग्रामसेवक श्री. शेख यांनी माझेकडे 2 टक्के प्रमाणे म्हणजे 20,000/-रु. मागणी करुन, पंचायत समिती, मुरबाड येथील आवारात 17,500/-रु. स्विकारली असता दिनांक 11/06/2024 रोजी 15:20 वा. पंचायत समिती, मुरबाड येथे रंगेहाथ पकडले. तरी माझी त्यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्याद असून, त्यांचेविरूध्द कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीतून लॅपटॉपवर टंकलीखीत करण्यात आली असुन ती मी वाचून पाहिली असता, माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

Scanned with OKEN Scanner

3. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAMOD DNYANESHWAR BABAR(I (Inspector)) / PBMH69131 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
[illegible] पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAMOD DNYANESH
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH69131

Scanned with OKEN Scanner